**महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण,२००१**
**महाराष्ट्र स्पोर्टस् ईन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट**
**प्लॅन अंतर्गत क्रीडा सुविधा निर्माण करणे.**

**महाराष्ट्र शासन**
सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक :राक्रीधो-२००३/प्र.क्र.११/क्रीयुसे-१,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२
दिनांकः २६ मार्च,२००३

**प्रस्तावना** :- महाराष्ट्राचे पुढील लक्ष्य एशियाड, ऑलिम्पिक व जागतिक स्पर्धा असे ठेवण्यात आले असून त्याकरिता एक विशिष्ट दिशेने प्रयत्न करणे त्याकरिता आकृतिबध्द कार्यक्रम आखणे व नियोजनात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील खेळाडू आशियाई व जागतिक स्तरावर चमकण्याच्या दृष्टीने योग्य त्या क्रीडा सुविधा गावोगावी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याकरिता खाजगी गुंतवणुकदार, कॉपोरेट बॉडीज्, खाजगी कंपन्या यांनादेखील या लक्ष्यामध्ये सामावून घेऊन क्रीडा क्षेत्रामध्ये महाराष्ट्राचे नांव अत्युच्य ठिकाणी नेण्याकरिता योजना तयार करणे आवश्यक आहे. याकरिता **"महाराष्ट्र स्पोर्टस् इन्फास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन" (Maharshtra Sports Infrastructure Development Plan)** तयार करण्यात यावा.

महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण १९९६ नुसार महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी विविध खेळांच्या सुविधा निर्माण करण्याकरीता जिल्हा क्रीडा संकुलाची स्थापना,त्याचप्रमाणे पथदर्शी प्रकल्प म्हणून प्रत्येक जिल्ह्यामध्ये एका तालुक्यामध्ये जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास मान्यता देण्यात आली होती. तथापि, या योजने अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी बांधकामाचे वाढते दर, तंत्रज्ञानामध्ये होणारा बदल व अन्य बाबी लक्षात घेता, संपूर्ण योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल करण्याची आवश्यक्यता दिसून येत आहे. महाराष्ट्र राज्य क्रीडा धोरण २००१ अंतर्गत क्रीडा विकासाकरीता तालुका हा घटक धरण्यात आला असून तालुका स्तरावर प्रत्येक तालुक्यामध्ये तालुका क्रीडा संकुल यामध्ये विविध खेळांच्या किमान सुविधा उपलब्ध करुन देणे त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर जिल्हा क्रीडा संकुलांतर्गत राष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देणे व विभागीय स्तरावर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा निर्माण करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. अशा प्रकारे राज्यामध्ये सर्व ठिकाणी या क्रीडा सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता **१) तालुका क्रीडा संकुल २) जिल्हा क्रीडा संकुल ३) विभागीय क्रीडा संकुल** सुधारीत स्वरुपात प्रस्तावित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय** :- सद्या राबविण्यात येणाऱ्या तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र, जिल्हा क्रीडा संकुलाची स्थापना या दोन योजना तसेच विभागीय क्रीडा संकुलाबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश अधिक्रमित (**Supersede**) करुन पुढील योजनांना मान्यता देण्यात येत आहे.

१. प्रत्येक तालुक्यामध्ये विविध खेळांच्या किमान सुविधा असलेल्या तालुका क्रीडा संकुलाची स्थापना करण्यात यावी.

२.  प्रत्येक जिल्ह्यामध्ये किमान राष्ट्रीय व अतिरिक्त स्वरुपात आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडा सुविधा असलेल्या जिल्हा क्रीडा संकुलाची स्थापना करण्यात यावी.

३.  महसूल विभाग निहाय प्रत्येक विभागामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडा सुविधायुक्त विभागीय क्रीडा संकुलाची स्थापना करण्यात यावी.

४.  महाराष्ट्र राज्याचे क्रीडा धोरण २००१ अंतर्गत मुंबईच्या क्रीडा विकासाकरीता विशेष कृती आराखडा तयार करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. ह्या अंतर्गत मुंबई शहराकरिता एक विभागीय क्रीडा संकुल, तसेच कोकण विभागाचे विभागीय क्रीडा संकुल ठाणे-नवीमुंबई येथे घेण्यात यावे त्याचप्रमाणे मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्याकरिता दोन जिल्हा क्रीडा संकुले व वीस तालुका क्रीडा संकुलांची निर्मिती करण्यात यावी.

२.  **महाराष्ट्र स्पोर्टस् इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्लॅन "अंतर्गत तालुका स्तरावर तालुका क्रीडा संकुल,जिल्हास्तरावर जिल्हा क्रीडा संकुल व विभागीय स्तरावर विभागीय क्रीडा संकुल"** तयार करण्याच्या दृष्टीने पुढील सुधारीत खर्चास मान्यता देण्यात येत आहेत.

| क्रीडा संकुल | प्रचलित खर्च | प्रस्तावित खर्च |
|---|---|---|
| तालुका क्रीडा संकुल | रु. ७.०० लाख | रु.२५.०० लाख |
| जिल्हा क्रीडा संकुल | रु.२००.०० लाख | रु.४००.०० लाख |
| विभागीय क्रीडा संकुल | रु.१२००.०० लाख | रु.१६००.०० लाख |

**तालुका क्रीडा संकुल** :- राज्याच्या प्रत्येक तालुक्यामध्ये तालुका क्रीडा संकुलाची निर्मिती करण्यात यावी. सदर तालुका क्रीडा संकुलाची जागा सर्वप्रथम निश्चित करण्यात यावी. सदर तालुका क्रीडा संकुलाची जागा, तालुका क्रीडा संकुल समिती, जिल्हाधिकारी संबधित लोकप्रतिनिधींच्या सहमतीप्रमाणे निश्चित करतील. व अंतिम मान्यतेकरीता संचालक, क्रीडा व युवक सेवा यांचे सहमतीकरीता सादर करण्यात येईल. जागा शक्यतो तालुक्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी असावी. मात्र जर इतर जागा अधिक सोईची व मध्यवर्ती ठिकाणी असेल व त्या बाबतीत सर्वमत असेल तर अशी जागा निश्चित करता येईल. तालुका क्रीडा संकुलामध्ये किमान सुविधा सोबतच्या परिशिष्ट "अ" प्रमाणे उपलब्ध करुन देण्यात येतील व या सुविधेनुसार यांचा **ब्रॉझ पॅकेज, सिल्वर पॅकेज, गोल्ड पॅकेज** असे संबोधण्यात येऊन निधी उपलब्धतेप्रमाणे त्याचप्रमाणे वाणिज्यीक प्रयोजनाचा वापर करून सदर योजना अंमलात आणता येईल. परंतु, प्रत्येक ठिकाणी किमाण ब्रॉझ पॅकेज असेल व त्यातील किमान सुविधा असलेले तालुका क्रीडा संकुलाची निर्मिती करण्यात येईल.

यामध्ये ब्रॉझ पॅकेजपेक्षा अधिक सुविधा उपलब्ध करावयाच्या असल्यास निधी संकलनाबाबत स्पष्ट नमुद करुन ज्या यंत्रणेमार्फत निधी प्राप्त होणार आहे अशा यंत्रणेचे निधी उपलब्धतेचे हमीपत्र उपलब्ध करुन प्रस्ताव संचालक, क्रीडा व युवक सेवा यांचे मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. ब्रॉझ पॅकेज नंतर वरचे पॅकेज करीता निरनिराळ्या सुविधा वेळोवेळी निधीच्या उपलब्धतेप्रमाणे सुविधांची निर्मिती करण्यात येईल. मात्र संभाव्य सिल्वर किंवा गोल्ड पॅकेजकरीता लागणारी जागा सुरुवातीस उपलब्ध करुन घेण्यात यावी. ब्रॉझ, सिल्वर व गोल्ड पॅकेज मधील सुविधांची मार्गदर्श तत्वे स्वंतत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

**आवर्ती खर्च** :- तालुका क्रीडा संकूल समितीने तालुका क्रीडा संकूल देखभालीकरीता उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यात यावेत. देखभालीकरीता रु.३.०० लाख प्रतिवर्षी अनुदान अनुज्ञेय राहील. (वेतन भत्यासह)

३. **क्रीडा सुविधा** :- जिल्हा क्रीडा संकुल अंतर्गत घ्यावयाच्या सर्वसाधारण बाबी परिशिष्ट "ब" मध्ये नमूद करण्यात आल्या आहेत. तथापि यासंदर्भात तयार करावयाच्या प्रकल्प अहवालास राज्यस्तरीय क्रीडा विकास समितीकडून मान्यता घेण्यात यावी.

विभागीय क्रीडा संकुलांतर्गत घ्यावयाच्या सर्वसाधारण सुविधा सोबतचे परिशिष्ट-"क" मध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत. या योजनेअंतर्गत विभागीय स्तरावर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सर्वसाधारणपणे परिशिष्ट- "क " मध्ये नमूद केलेल्या सुविधा अत्याधुनिक स्टेडियम/इनडोअर हॉल/ सिंथेटिंक ४०० मीटर धावनपथ १० लेन्ससह ऑलिंपिक साईज जलतरण तलाव प्रेक्षागृहासह,इनडोअर स्टेडियम प्रेक्षागृहासह इ. सुविधा शक्यतो एकाच ठिकाणी असणे आवश्यक राहील. तथापि उपयोगितेप्रमाणे शहराच्या विविध भागात देखिल घेता येतील. या विभागीय क्रीडा संकुलामध्ये हॉकीचे ॲस्ट्रोटर्फ मैदानाचे तसेच शूटींग रेंजचे काम घेण्यात यावे. आंतरराष्ट्रीय स्पर्धा आयोजित करणे शक्य होईल अशा प्रकाराच्या क्रीडा सुविधा हाती घेण्यात याव्यात. या योजनेअंतर्गत आंतरराष्ट्रीय स्पर्धाकरींता आवश्यक असलेलं क्रीडा साहित्यासह विभागीय क्रीडा संकुलाची निर्मिती करावी.

जिल्हा/विभागीय क्रीडा संकूलाची निर्मिती करण्याकरीता सोबतचे परिशिष्ट-" ड " प्रमाणे क्रीडा संकूल समितीची स्थापना करण्यात यावी. प्रत्येक क्रीडा संकूल समितीमार्फत क्रीडा सुविधांबाबत प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास, राज्यस्तरीय क्रीडा विकास समितीकडून मान्यता घेण्यात यावी. या जिल्हा/ विभागीय क्रीडा संकूल निर्मितेबाबत सूचना सर्वसाधारणपणे देण्यात येत असून याबाबतीत सविस्तर मार्गदर्शनात्मक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

४. **क्रीडा सुविधांचे नियोजन** :- राज्यामध्ये क्रीडा सुविधांचे नियोजन राज्यस्तरीय क्रीडा विकास समितीमार्फत केले जाईल.

५. **क्रीडा संकुलांच्या जागेची निवड** :- सदर क्रीडा संकुलांकरिता जागेची निवड करताना या सुविधांचा जास्तीत जास्त जनतेतर्फे विशेषतः विद्यार्थी/खेळाडू यांना सोयीस्कर वापर करता येणे ही बाब महत्वाची असून सदर संकुले निर्जन ठिकाणी नसावीत, म्हणजेच वाहतूक/संपूर्क/व्यवस्थापनाच्या दृष्टीने नागरिकांना/ संबधितांना सोयीची असावीत. याकरिता यामध्ये क्रीडा सुविधांच्या बाबी शक्यतो एकाच ठिकाणी असाव्यात परंतु एकाच ठिकाणी आवश्यक असलेली मोठी जागा उपलब्ध होत नसल्यास अथवा एखादी सुविधा उपलब्ध असल्यास क्रीडा सुविधा विविध ठिकाणी घेण्यास हरकत नसावी. त्याचप्रमाणे एखाद्या सुविधेचा वर्षभरामध्ये किती प्रमाणात वापर होईल तसेच अशा प्रकारची क्रीडा सुविधा यापूर्वीच उपलब्ध आहे काय याची शहानिशा करुन उपयोगिता (**Utility**) याचा विचार करुन,सदर सुविधा या योजने अंतर्गत घेणे आवश्यक आहे काय, याचा विचार करुनच प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा. तसेच संबंधित विभागातील खेळांची लोकप्रियता लक्षात घेऊन विहित अनुदानाच्या अधिन राहून एखादी नविन सुविधा मान्य बाबी व्यतिरिक्त घेता येईल अथवा मान्य

बाबींमध्ये सुधारणा करता येईल. विभागीय व जिल्हा क्रीडा संकुल मात्र विभागीय व जिल्हा मुख्यालय ठिकाणीच घेण्यात यावेत.

६. राज्यांमध्ये कोकण विभागाचे विभागीय क्रीडा संकुल,ठाणे/नवी मुंबई तेथे तसेच नाशिक,पुणे,औरंगाबाद,नागपूर व अमरावती या प्रत्येक महसूल विभागात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधायुक्त विभागीय क्रीडा संकुलांची स्थापना करण्यात यावी. तसेच मुंबई शहरांकरिता मुंबई शहर व मुंबई उपनगर यासाठी अधिकच्या विभागीय क्रीडा संकुलाची निर्मिती करण्यात यावी.

**निधी** :- जिल्हा क्रीडा संकुल योजनेअंतर्गत एकुण रु.४.०० कोटी इतका कमाल निधी उपलब्ध करुन दिला जाईल. या योजनेअंतर्गत रु.४.०० कोटी अनुदान प्रत्येक जिल्हा क्रीडा संकुलाकरीता अनुज्ञेय असेल. यापूर्वी मंजूर करण्यात आलेल्या जिल्हा क्रीडा संकुलाकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी एकुण रु.४.०० कोटी मधून वजा करुन उर्वरीत निधी आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देण्यात येईल.यामध्ये चालू असलेली बांधकामे निधीअभावी खोळंबली असल्यास या निधीमधुन सदर कामे पूर्ण करता येतील. तथापि याबाबतचा वेगळा प्रस्ताव राज्य क्रीडा विकास समितीस मान्यतेसाठी सादर करावा लागेल.त्याचप्रमाणे यापूर्वी एखादी क्रीडा सुविधा घेतली गेली नसल्यास त्याकरिता नविन प्रस्ताव सादर करता येऊ शकतील.

विभागीय क्रीडा संकुलाकरीता एकुण रु.१६.०० कोटी पर्यंत निधी अनुदान स्वरुपात उपलब्ध करुन दिला जाईल.यामध्ये महसूल विभागनिहाय नागपूर,औरंगाबाद,अमरावती,पुणे,नाशिक,कोकण (नवी मुंबई व ठाणे) व मुंबई या विभागीय क्रीडा संकुलाकरिता निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

**आवर्ती खर्च** :- जिल्हा क्रीडा संकुलांच्या देखभालीकरीता खर्च पहिल्या वर्षाकरिता रु.१०.०० लाख, व्दितीय वर्षाकरीता रु.७.५० लाख व तृतीय वर्षाकरीता रु.५.०० लाख असा मंजूर करण्यात येत आहे.(वेतन भत्यासह)

विभागीय क्रीडा संकुलाच्या देखभालीकरीता प्रथम वर्षाकरीता रु.१५.०० लाख,व्दितीय वर्षाकरीता रु.१२.५० लाख व तृतीय वर्षाकरीता रु.१०.०० लाख एवढे वार्षिक अनुदान प्रस्तावित करण्यात येत आहे (वेतन भत्यासह) क्रीडा संकूल समितीने देखभाल खर्च भागविण्याकरीता उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करण्याबाबत प्रथमपासून प्रयत्न करुन स्वयंपूर्ण व्हावे.

७. **खासगी गुंतवणूक** :- क्रीडा विकासाच्या या पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याकरीता मोठ्या प्रमाणावर विकास निधीची आवश्यक्यता लक्षात घेऊन यामध्ये खाजगी गुंतवणूक आणल्यास प्रस्तावित योजनेपेक्षा मोठ्या प्रमाणात क्रीडा विकासाच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देता येतील. अशाप्रकारे क्रीडा,संकुलांची निर्मिती वाणिज्यिक प्रयोजन अथवा खाजगी गुंतवणूकीव्दारा प्रकल्प हाती घेत असल्यास महाराष्ट्र इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट ॲन्ड सपोर्ट ॲक्ट यांच्या तरतुदीस अधिन राहून सदर प्रकल्प हाती घेण्यात यावा. याबाबतीत सविस्तर आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत.

८. **प्रकल्प कार्यान्वित करणारी यंत्रणा (Implementing Agency)** :- तालुका क्रीडा संकुलाकरीता तालुका क्रीडा संकुल समिती, जिल्हा क्रीडा संकुल समितीकरीता जिल्हा क्रीडा संकुल समिती, विभागीय क्रीडा संकुलाकरीता विभागीय क्रीडा संकुल समिती अशा प्रकारे प्रकल्प कार्यान्वित करण्याकरीता समित्या **परिशिष्ट-एक** प्रमाणे स्थापन करण्यात याव्यात. नागरी भागाकरीता समित्या निर्मितीचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.(समित्यांच्या कामकाजाबाबत मार्गदर्शक तत्वे स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

विभागीय व जिल्हा क्रीडा संकुलाची उभारणीकरिता त्या त्या समिती यांना बांधकामाचे देखभाल व इतर कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून,खाजगी (Architect) कडुन किंवा दोघांमध्ये विभागून करता येईल. दोघांमध्ये ४ % E.T.P रक्कम विभागून देता येईल.याबाबत मार्गदर्शक तत्वे राज्यस्तरीय क्रीडा विकास समितीकडून देणेत येतील. तालुका क्रीडा संकूला प्रमाणेच सर्व विभागीय व जिल्हा क्रीडा संकुलाकरिता ही एकच रंग योजना (Colour Scheme) राज्य स्तरीय क्रीडा विकास समितीकडून ठरविण्यात येईल.

९) **क्रीडा संकूल अनुदान टप्पे** :- तालुका क्रीडा संकुलाकरिता रु.२५.०० लाख देय असलेले अनुदान एकरकमी प्रस्तावाच्या मान्यतेसह उपलब्ध करुन दिले जातील. जिल्हा क्रीडा संकुल, विभागीय क्रीडा संकुल याचा प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता जागा शोधून/उपलब्ध झाल्यानंतर प्राथमिक खर्चासाठी जिल्हा संकुलाकरिता रु.५.०० लाख, विभागीय क्रीडा संकुलाकरिता रु.१०.०० लाख उपलब्ध करुन देण्यात येतील. तसेच जिल्हा क्रीडा संकुलाकरीता रु.४.०० कोटी व विभागीय क्रीडा संकुलाकरीता रु.१६.०० कोटी अनुदान अनुज्ञेय असेल व सदर पूर्ण रक्कम देय राहील. यामध्ये सोबतच्या परिशिष्ट १,२ व ३ मध्ये नमूद केलेल्या बाबींचा समावेश असेल. प्रस्ताव मान्यतेसोबत एकूण खर्चाच्या २०% व तद्‌नंतर बांधकाम प्रगतीनुसार निधी उपलब्ध करुन दिला जाईल. सन २००२-२००३ या अर्थिक वर्षामध्ये तालुका क्रीडा संकुलाकरीता उपलब्ध करुन द्यावयाचा निधी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा क्रीडा संकुल समितीकडे वर्ग करण्यात यावा व जिल्हा क्रीडा संकुल समितीमार्फत सदर निधी तालुका क्रीडा संकुल समितीकडे वर्ग करण्यात यावा.

विभागीय व जिल्हा क्रीडा संकुल यांना निधी मुक्त करण्याच्या पध्दतीचे निकष स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

१०) **उद्दीष्टे व मार्गदर्शक तत्वे** (Objective & Guiding Principles):- सदर केंद्रे लोकाभिमूख असावीत. संकुलामध्ये सर्वसामान्य विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश असावा. केवळ वाणिज्यिक प्रयोजन म्हणून उच्चभ्रू उच्चपदस्थांसाठी सुविधा न ठेवता सर्वसामान्यांना वापर करता येईल यादृष्टीने प्रयत्न करण्यात यावे. क्रीडा संकुलाच्या मैदानाचा वापर पहिली ते आठवी च्या विद्यार्थ्यांकरिता मोफत ठेवण्यात यावा. त्यापुढील विद्यार्थ्यांकरिता किमान मासिक शुल्क आकारण्यात यावे. शाळा व महाविद्यालये शैक्षणिक व इतर संस्था यांना मैदान वापरासाठी वार्षिक सदस्यत्व (शुल्क आकारुन देण्यात यावे) मोफत कुठलीही सुविधा उपलब्ध करुन देण्यात येऊ नये. वार्षिक खेळ/वार्षिक कार्यक्रम याकरिता शुल्क आकारण्यात यावे. प्रत्येक इनडोअर खेळाच्या सुविधेकरिता योग्य ते शुल्क आकारण्यात यावे. (प्रत्येक खेळाच्या संघटनेच्या प्रतिनिधी समवेत चर्चा करुन कार्यकारी समितीने सदर शुल्क ठरविण्यात यावे.) सदर कार्यकारणी समितीने खेळांच्या सुविधेचे वेळापत्रक वर्षभरातील स्पर्धाचे/ प्रशिक्षण कार्यक्रमाचे वेळापत्रक तयार करावे. क्रीडा व्यतिरिक्त शासन विहित करील एवढया दिवसाकरिता मैदाने व अन्य जागेचा वापर वाणिज्यिक प्रयोजनासाठी करण्यास परवानगी देण्यात येईल.इनडोअर हॉल व साहित्य सामुग्रीची देखभाल करण्याची जबाबदारी संबधित कार्यकारिणी समितीची असेल.(याबाबतची मार्गदर्शक तत्वे स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.)

११) या संदर्भात विस्तृत सूचना/नियमावली वेगळयाने निर्गमित करण्यात येतील. यावर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली त्या त्या अर्थिकवर्षात केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

**(अ) "२२०४-क्रिडा व युवकसेवा- १०४- क्रीडा व खेळ, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना (१०)(०२) क्रीडा प्रशिक्षण केंद्राची आस्थापना, ४१- सहाय्यक अनुदान,(२२०४ ०४५ ५) मागणी क्र.अेन-२"**

**(ब) "२००४ – क्रीडा व युवकसेवा-१०४-क्रीडा व खेळ, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (१६)(०२) – क्रीडा संकुलाची स्थापना, ४१-सहाय्यक अनुदान,(२२०४ ०५५३) मागणी क्र.अेन-२"**

१२) सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचेकडील अनौपचारिक संदर्भ क्रमांकः ३०२/०३/व्यय-१४, दिनांक २६/०३/२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**(प्रदीप सं.इंदुलकर)**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव, मुंबई
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय,
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय,
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता)
संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
सर्व जिल्हाधिकारी/सर्व जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समिती (पत्राने)
सर्व प्रांत अधिकारी/तहसिलदार.
उपसंचालक,क्रीडा व युवक सेवा, मुंबई/नागपूर/औरंगाबाद/कोल्हापूर सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी/तालुका क्रीडा अधिकारी.
उपसचिव,महसूल व वन विभाग/नियोजन विभाग/वित्त विभाग/सार्वजनिक बांधकाम विभाग/ग्रामविकास व जलसंधारण विभाग/नगरविकास विभाग
सर्व महापालिका आयुक्त/सर्व मुख्याधिकारी, नगर परिषद
मा.मंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (क्रीडा) यांचे खाजगी सचिव
मा.प्रधान सचिव (क्रीडा) यांचे स्वीय सहायक
निवड नस्ती (क्रीयुसे-१)

# परिशिष्ट "अ"

## तालुका क्रीडा संकुल

रु.लाखात

| अ. क्र | क्रीडा सुविधा | बॉझ पॅकेज | सिल्वर पॅकेज | गोल्ड पॅकेज |
|---|---|---|---|---|
| | (किमान जागा- एकर मध्ये ) | २.५ एकर | ९ एकर | १६ एकर |
| | | खर्च | खर्च | खर्च |
| १ | २०० मीटर धावनपथ | ४.०० | --- | --- |
| २ | ४०० मीटर धावनपथ | -- | ८.०० | ८.०० |
| ३ | दोन बॅडमिटन कोर्टसह इनडोअर गेम हॉल | १२.५० | १४.०० | २०.०० (वुडनकोर्टसह) |
| ४ | (अ) खो-खो, व्हॉलीबॉल, कबड्डीची प्रत्येकी दोन मैदाने,<br>(ब) बास्केट बॉल कोर्ट/लॉन टेनिस वा अन्य सुविधा/शूटिंग रेंज | १.८०<br>२.२० | १.८०<br>३.२० | १.८०<br>५.०० |
| ५ | स्विमिंग पूल ११ x २५ मीटर,सेमी ऑलिंपिक साईज | --- | --- | ६०.०० |
| ६ | पॅव्हेलीन, खुले प्रेक्षागृह | --- | --- | २.०० |
| ७ | क्रिकेट, हॉकी फुटबॉल मैदान | --- | ७.०० | ७.०० |
| ८ | बॉस्केट बॉल कोर्ट (विद्युत व्यवस्थेसह) | --- | ३.०० | ३.०० |
| ९ | वीस मुलांसाठी व मुलींसाठी वसतिगृह (डॉमेंटरीटाईप) | --- | --- | १०.०० |
| १० | डायनिंग हॉल | --- | --- | ५.०० |
| ११ | अंतर्गत रस्ते | --- | २.०० | ५.०० |
| १२ | पिण्याचे पाणी व स्वच्छता गृहे | --- | २.०० | ५.०० |
| १३ | तारेचे कुंपन व वनीकरण | --- | --- | ५.०० |
| १४ | बोअरवेल, इलेक्ट्रीक मोटारसह | ०.५० | ०.५० | १.०० |
| १५ | इतर किरकोळ खर्च | ०.५० | १.०० | २.०० |
| १६ | सुपरव्हिजन | ०.५० | २.०० | ६.०० |
| १७ | इलेक्ट्रिफिकेशन | ०.५० | २.०० | --- |
| १८ | रेन वॉटर हारवेस्टींग | --- | --- | --- |
| १९ | सोलार वॉटर सिस्टीम | --- | --- | --- |
| २० | क्रीडा साहित्य | १.५० | २.०० | ३.०० |
| २१ | कार्यालयीन साहित्य व संगणक (पूर्ण संच) | १.०० | १.५० | १.२० |
| | **एकुण** | **२५.००** | **५०.००** | **१५०.००** |

**टिप :- तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्रात निर्माण करावयाचा क्रीडा सुविधा व्यतिरिक्त संबधित तालुक्यात ज्या खेळांची आवड व परंपरा आहे अशा खेळांचा प्रशिक्षणासाठी क्रीडा सुविधा प्राधान्याने निर्माण करण्यात याव्यात.**

## परिशिष्ट - "ब"

## जिल्हा क्रीडा संकुल योजनेअंतर्गत सुविधा

| प्रस्तावित बाबी | अभिप्राय |
|---|---|
| **खुले प्रेक्षागृह**<br>४०० मीटर धावनपथ,<br>५००० प्रेक्षकांसाठी कॉन्क्रीटची प्रेक्षक गॅलरी,/कोलॅप्सेबल फिरती गॅलरी,हॉकी/फुटबॉल मैदान/प्रसाधनगृह/ चेंजिंग रुम (मुला/मुलींसाठी स्वंतत्र) क्रीडा साहित्यासाठी जागा.<br>(रु.७०.०० लाख) | प्रेक्षक गॅलरी ५ ते १० हजार प्रेक्षकाकरिता तयार करण्यात यावी. स्टेडियम स्वरुपात बांधकाम करावयाचे असल्यास त्याकरिता आवश्यक असलेला अधिकचा निधी स्थानिकरित्या संकलित करण्यात यावा. शक्यतो कोलॅप्सेबल फिरत्या गॅलरीचा विचार करण्यात यावा.जेणेकरुन जिल्ह्यामधील इतर शहरामध्ये स्पर्धाचे आयोजन करावयाचे असल्यास त्याचा उपयोग करता येईल. स्टेडियमचा वापर होत असल्यासच त्यांचा विचार करण्यात यावा. तथापि याच्या देखभालीचा खर्च इनबिल्ट असावा. म्हणजे उत्पन्नाची सुविधा असलेल्या ठिकाणीच उपयोगिता लक्षात घेऊन स्टेडियमसारख्या वास्तूचा विचार करण्यात यावा. |
| **खेळांची मैदाने**<br>हॉलीबॉल,बास्केटबॉल ची मैदाने, खो-खो, कबड्डी या खेळांची प्रत्येकी दोन मैदाने, लॉन टेनिस व लोकप्रिय असलेल्या खेळांची अन्य मैदाने<br>(रु.१०.०० लाख) | यामध्ये मैदाने संमपातळीवर आणावयाचे असल्यास रोजगार हमी योजना व अन्य योजनांमधून काम पूर्ण करण्यात यावे त्यानुसार आवश्यकतेनुसार स्थानिक विकास निधी व अन्य माध्यमातून सदर खर्च भागविण्याचा प्रयत्न करण्यात यावा. |
| **मल्टिजिम,**<br>वेटलिफ्टिंग,फिजीकल एक्सरसाईज हॉल, फिटनेस सेंटर<br>(रु.१०.०० लाख) | गरज लक्षात घेऊन स्त्री व पुरुषांसाठी वेगळी वेळ अथवा वेगळ्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात याव्यात. यामध्ये योगसाधना, मल्लखांब, आहार सल्लागार व कौन्सिलिंग सेंटर असा बहुविध विचार करण्यात यावा. |
| **जलतरण तलाव**<br>८ लेन्ससह २५ x २१ मीटर, डायव्हिंगसह किंवा शिवाय परंतु फिल्टरेशन प्लॅन्टसह.<br>(रु.८०.०० लाख) | यामध्ये आवश्यकतेनुसार ऑलिंपिक साईज ५० x २१ मी. उच्च सुविधांसह बांधण्याचा विचार करण्यात यावा. |
| **इनडोअर हॉल**<br>(मल्टीपरपज गेम हॉल) सागवान लाकडाचे फ्लोअरींग/ सिंथेटिक फ्लोअरींग/ आर्टीफिशियल फ्लोअरिंग लॉनटेनिस सिंथेटिक फ्लोअरींग व हार्ड कोर्ट<br>(रु.१२०.०० लाख) | इनडोअर हॉलचा विचार करताना यामध्ये सर्व प्रकारच्या इनडोअर गेम्सचा विचार करण्यात यावा. उदा. जिम्नॅस्टिक्स,टेबल टेनिस,बॅडमिटन, व्हॉलीबॉल,बॉस्केटबॉल, स्क्वॅश इ. यामध्ये स्केटींग रींक व अन्य खेळांचा देखील विचार करण्यात यावा. यासोबतच शूटींग रेंज देखिल आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| **८० बेडचे वसतिगृह**<br>यामध्ये ३० बेड मुलींसाठी आवश्यक. शक्यतो डॉरमेटरी टाईप असावे.<br>(रु.६०.०० लाख) | सदरचे वसतिगृह केंद्रशासनाच्या युथ हॉस्टेल योजनेअंतर्गत बांधण्याचा प्रथम प्रयत्न करण्यात यावा व अत्यंत आवश्यक असेल व उपयोगाचे असेल तेव्हाच वसतिगृहाचा विचार करण्यात यावा अन्यथा वार्षिक देखभाल व उपयोगात आणले न गेल्यास खर्च वाया जाईल याचा पूर्णपणे विचार करण्यात यावा. |
| **खेळांचे साहित्य**<br>(रु.५०.०० लाख) | ॲथलॅटिक्सचे सर्व साहित्य जिम्नॅस्टिक्स, मल्लखांब, बॉक्सिंग रिंग, कुस्ती, ज्युदो,तायक्वांदो व जिम्नॅस्टिक्स मॅटस, लॉन टेनिस, तलवार बाजी, शूटींग रेंज व एअर वेपन तसेच अन्य साहित्य,टेबल टेनिस,बिलियर्डस् व स्नूकर,बॅडमिंटन, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल इत्यादीचे हलविण्याजोगे साहित्य अशाप्रकारे इनडोअर गेमचे अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करुन देण्यात यावे. |
| **एकुण खर्च :- (रु.४००.०० लाख)** | |

**टिप** :- जिल्हा क्रीडा अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निवासस्थान,कार्यालये,विश्रामगृह,महत्वाच्या व्यक्तीसाठी विश्रामगृह (V.I.P.Longe) इत्यादी बांधकामाचा समावेश वरील एकूण बांधकामामध्ये करण्यात यावा. (उपरोक्त बाबींच्या सर्वसाधारण खर्चाच्या रकमा दर्शविण्यात आल्या आहेत. सदर सुविधा व खर्च निर्देशित स्वरुपाचा (Indicative) असून त्यामध्ये स्थळपरत्वे बदल करता येईल.)

## परिशिष्ट - "क"
## विभागीय क्रीडा संकुल योजनेअंतर्गत सुविधा

(रुपये लाखात)

| अ.क्रं. | प्रस्तावित क्रीडा सुविधाचा तपशील | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | **खुले प्रेक्षागृह :-**<br>१० लेनचा सिंथेटिक ट्रॅक, २० हजार प्रेक्षाकांसाठी गॅलरी फ्लड लाईटसह, पॅव्हेलियन व प्रशासकीय इमारत. | ७००.०० |
| २ | **बंदिस्त जलतरण तलाव :-**<br>५० x २१ मीटर ऑलिम्पीक साईज डायव्हींग तलाव, फिल्टरेशन प्लॅन्टसह | २००.०० |
| ३ | **बंदिस्त प्रेक्षागृह** (वातानुकुलित)<br>३६ x १२.५ मीटर आकाराचे वुडन/सिंथेटीक फ्लोअरिंगसह | १५०.०० |
| ४ | **ॲस्ट्रोटर्फ हॉकी मैदान :-** | ३००.०० |
| ५ | **विविध खेळांची क्रीडांगणे :-**<br>फुटबॉल,हॅण्डबॉल,कबड्डी,खो-खो बॉस्केटबॉल कोर्ट, टेनिस कोर्ट सरावासाठी ४०० मीटर सिंडर ट्रॅक. | १५०.०० |
| ६ | **आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा साहित्य :-**<br>उदा. जिम्नॅस्टिक्सची सर्व उपकरणे, ॲथलेटिक्स इक्ट्रॉनिक्स स्टॉपवाचेस, स्विमींग इलेक्ट्रॉनिक टचपॅड,बास्केटबॉल हॅड्रॉलिक अपराईट बोर्ड, कुस्ती, ज्युडो कराटे व जिम्नॅस्टिक मॅटस् इ. | १००.०० |
| | **एकुण रुपये** | **१६००.००** |

**टिप** :- (उपरोक्त बाबींच्या सर्वसाधारण खर्चाच्या रकमा दर्शविण्यात आल्या आहेत. सदर सुविधा व खर्च निर्देशित स्वरुपाचा (Indicative) असून त्यामध्ये स्थळपरत्वे बदल करता येईल.)

## परिशिष्ट - "ड"

## तालुका/जिल्हा/विभागीय क्रीडा संकुल समिती रचना

| तालुका क्रीडा संकुल समिती | जिल्हा क्रीडा संकुल समिती | विभागीय क्रीडा संकुल समिती |
|---|---|---|
| १. तहसिलदार -- अध्यक्ष<br>२. गटविकास अधिकारी -- सदस्य<br>३. उप अभियंता, सा.बां.वि -- सदस्य<br>४. मुख्य अधिकारी नगर परिषद – सदस्य<br>५. पोलिस निरीक्षक -- सदस्य<br>६. गट शिक्षण अधिकारी -- सदस्य<br>७. तालुका क्रीडा अधिकारी --<br>गट शिक्षण अधिकारी सदस्य सचिव<br>**आमंत्रित**<br>अ) तालूका मुख्याध्यापक, शारीरिक शिक्षण शिक्षक, क्रीडा मंडळे यांचा प्रत्येकी एक प्रतिनिधी.<br>ब) तालुक्यातील राष्ट्रीय व राज्य पातळीवरील खेळाडूंचा एक प्रतिनिधी<br>क) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेचे सदस्य<br>**समितीचे कार्य व अधिकार**<br>१. तालुका क्रीडा संकुल समितीची नोंदणी करणे. संबधित तालुक्यातील उपलब्ध क्रीडा सुविधांचा अभ्यास करुन स्थानिक लोकप्रिय खेळास चालना देण्याच्या दृष्टीने क्रीडा सुविधा निर्माण करण्याचे नियोजन करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पास मान्यता घेणे. प्रकल्पाच्या | १. जिल्हाधिकारी -- अध्यक्ष<br>२. आयुक्त,महानगरपालिका -- सदस्य<br>(नगरपालिका क्षेत्र असल्यास<br>मुख्य अधिकारी)<br>३. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.– सदस्य<br>४. जिल्हा पोलिस अधिक्षक – सदस्य<br>५. कार्यकारी अभियंता,सा.बां.वि -- सदस्य<br>६. उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा -- सदस्य<br>७. जिल्हा शिक्षणाधिकारी -- सदस्य<br>(प्राथमिक/माध्यमिक)<br>८. जिल्हा माहिती अधिकारी -- सदस्य<br>९. जिल्हा क्रीडा अधिकारी -- सदस्य सचिव<br>**आमंत्रित**<br>अ) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेचे सदस्य<br>ब) मान्यता प्राप्त जिल्हा क्रीडा संघटनेचे प्रतिनिधी<br>क) राज्य व राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारार्थी<br>ड) आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू.<br>(आवश्यकतेनुसार इतर तज्ञ व्यक्तींना देखिल आंमत्रित करता येईल.) | १. विभागीय आयुक्त -- अध्यक्ष<br>२. आयुक्त,महानगरपालिका -- सह अध्यक्ष<br>३. पोलिस आयुक्त -- सदस्य<br>४. जिल्ह्याधिकारी – कार्याध्यक्ष<br>५. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.-- सदस्य<br>६. अधिक्षक अभियंता(सा.बा.वि) -- सदस्य<br>७. उप वास्तूशास्त्रज्ञ -- सदस्य<br>८. उपसंचालक,क्रीडा व युवकसेवा -- सदस्य<br>९. विभागीय माहिती अधिकारी -- सदस्य<br>१०.जिल्हा क्रीडा अधिकारी -- सदस्य सचिव<br>**आमंत्रित**<br>अ) महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषदेचे सदस्य<br>ब) मान्यता प्राप्त जिल्हा क्रीडा संघटनेचे प्रतिनिधी<br>क) राज्य व राष्ट्रीय क्रीडा पुरस्कारार्थी<br>ड) आंतरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडू.<br>(आवश्यकतेनुसार इतर तज्ञ व्यक्तींना देखिल आंमत्रित करता येईल.) |

| | | |
|---|---|---|
| अमलबजावणीचे सनियंत्रण करणे. | | |
| २. तालुका क्रीडा विकास निधी उभारणे व व्यवस्थापन करणे.तालुका क्रीडा संकुल केंद्राअंतर्गत घेण्यात आलेल्या क्रीडा सुविधांची देखभाल व दुरुस्ती करणे.<br><br>३. तालुका स्तरावर विविध खेळांचा प्रचार व प्रसार करणे क्रीडा प्रशिक्षण शिबिर, क्रीडा स्पर्धा व युवक कल्याण विषयक उपक्रम राबविणे,क्रीडा चर्चासत्र व कार्यशाळेचे आयोजन करणे.<br><br>४. तालुका क्रीडा संकुल समिती अंतर्गत बांधकाम समिती, क्रीडा विकास समिती, व्यवस्थापन समितीची स्थापना करणे इत्यादी.<br><br>५. तालुका क्रीडा विकास संकलित करणे. | **<u>समितीचे कार्य व अधिकार</u>**<br>१. जिल्हा क्रीडा संकुल समितीची नोंदणी करणे. संबधित जिल्ह्यातील उपलब्ध क्रीडा सुविधांचा अभ्यास करुन स्थानिक लोकप्रिय खेळास चालना देण्याच्या दृष्टीने किंवा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुविधायुक्त क्रिडा सुविधा निर्माण करण्याचे नियोजन करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पास मान्यता घेणे, प्रकल्पाच्या अमलबजावणीचे सनियंत्रण करणे.<br><br>२. जिल्हा क्रीडा विकास निधी उभारणे व व्यवस्थापन करणे.जिल्हा क्रीडा संकुल केंद्राअंतर्गत घेण्यात आलेल्या क्रीडा सुविधांची देखभाल व दुरुस्ती करणे.<br><br>३. जिल्हा स्तरावर विविध खेळांचा प्रचार व प्रसार करणे क्रीडा प्रशिक्षण शिबिर, क्रीडा स्पर्धा व युवक कल्याण विषयक उपक्रम राबविणे,क्रीडा चर्चासत्र व कार्यशाळेचे आयोजन करणे.<br>४. जिल्हा क्रीडा संकुल समिती अंतर्गत बांधकाम समिती, क्रीडा विकास समिती, व्यवस्थापन समितीची स्थापना करणे इत्यादी.<br><br>५. जिल्हा क्रीडा विकास निधी संकलित करणे. | **<u>समितीचे कार्य व अधिकार</u>**<br>१. विभागीय क्रीडा संकुल समितीची नोंदणी करणे. संबंधित विभागातील उपलब्ध क्रीडा सुविधांचा अभ्यास करुन स्थानिक लोकप्रिय खेळास चालना देण्याच्या दृष्टीने किंवा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सुविधायुक्त क्रीडा सुविधा निर्माण करण्याचे नियोजन करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, प्रकल्पास मान्यता घेणे, प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे.<br><br>२. विभागीय क्रीडा विकास निधी उभारणे व व्यवस्थापन करणे.विभागीय क्रीडा संकुल केंद्राअंतर्गत घेण्यात आलेल्या क्रीडा सुविधांची देखभाल व दुरुस्ती करणे.<br><br>३. विभागीय स्तरावर विविध खेळांचा प्रचार व प्रसार करणे क्रीडा प्रशिक्षण शिबिर, क्रीडा स्पर्धा व युवक कल्याण विषयक उपक्रम राबविणे,क्रीडा चर्चासत्र व कार्यशाळेचे आयोजन करणे.<br>४. विभागीय क्रीडा संकुल समिती अंतर्गत बांधकाम समिती, क्रीडा विकास समिती, व्यवस्थापन समितीची स्थापना करणे इत्यादी.<br><br>५. विभागीय क्रीडा विकास निधी संकलित करणे. |